# प्र सि द्धि प त्र क

महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा **रविवार, दिनांक २१ जून, २०२६** रोजी मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या चार विभागीय कार्यालयांच्या ठिकाणी आयोजित करण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील आवेदनपत्रे विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्यामार्फत खाली नमूद केलेल्या संबंधित विभागीय कार्यालयाकडे **दिनांक २० मे,२०२६** पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठविणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| **मुंबई व कोकण विभाग**<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, कोकण विभाग,<br>कोकण भवन, तिसरा मजला,नवी मुंबई - ४०० ६१४.<br>दूरध्वनी क्र.०२२-२७५७३५४२ | **पुणे व नाशिक विभाग**<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे- ४११ ००१.<br>दूरध्वनी क्र.०२०-२६१२१७०९. |
| **नागपूर व अमरावती विभाग**<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, प्रशासकीय इमारत,<br>दुसरा मजला, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१.<br>दूरध्वनी क्र. ०७१२-२५६४९५६. | **छत्रपती संभाजीनगर विभाग**<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,<br>छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००१.<br>दूरध्वनी क्र. ०२४०-२३६१३७२ |

शासकीय सेवेतील राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा **<u>रविवार, दिनांक ०५ जुलै, २०२६</u>** रोजी मुंबई येथे आयोजित करण्यात येणार आहे. सदर परीक्षेसाठी विहित नमुन्यातील आवेदनपत्रे विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्यामार्फत या कार्यालयाकडे खाली नमूद केलेल्या पत्त्यावर **दिनांक १० जून, २०२६** पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठविणे आवश्यक आहे.

**भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य,**
**भाषा संचालनालय, प्रशासकीय इमारत,**
**५ वा मजला, डॉ.आंबेडकर उद्यानाजवळ,**
**शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई ४०००५१.**

**अराजपत्रित कर्मचारी व राजपत्रित अधिकाऱ्यांची अनुक्रमे जून २०२६ व जुलै २०२६ मधील मराठी भाषा निम्नस्तर परीक्षा (प्रश्नपत्रिका क्र.१) ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत मंडळाच्या सुधारित अभ्यासक्रमाचे इयत्ता ९ वी साठी निश्चित केलेले "अक्षरभारती (द्वितीय भाषा)" या संपूर्ण पुस्तकावर आधारित घेण्यात येईल. मराठी भाषा उच्चस्तर परीक्षा (प्रश्नपत्रिका क्र.१) ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत मंडळाचे सुधारित अभ्यासक्रमाचे इयत्ता १० वी साठी मार्च/एप्रिल २०१८ मध्ये निश्चित केलेले "अक्षरभारती (द्वितीय भाषा)" या संपूर्ण पुस्तकावर आधारित घेण्यात येईल. प्रश्नपत्रिका क्र.२ च्या अभ्यासक्रमात कोणताही बदल नाही.**

**<u>परीक्षेस प्रवेश मिळण्यासाठी सदर आवेदनपत्रात उमेदवाराचे पूर्ण नाव, कार्यालयाचा पूर्ण पत्ता, (पिन कोड क्रमांकासह) व भ्रमणध्वनी क्रमांकासह आवेदनपत्र परिपूर्ण भरून मूळ चलनासह संबंधित कार्यालयाकडे उपरोक्त नमूद केलेल्या तारखेपूर्वी पाठविणे आवश्यक आहे.</u>** भाषा संचालनालयाच्या **directorate.marathi.gov.in** या संकेतस्थळावर भाषा संचालनालयाच्या मराठी भाषा परीक्षा व परीक्षा शुल्कासंबंधीची सर्व माहिती उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच सदर परीक्षांची कार्यक्रमपत्रिका व प्रवेशपत्र संकेतस्थळावर परीक्षेपूर्वी प्रसिध्द करण्यात येईल.

(अरुण वा.गिते)
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.

ठिकाण : मुंबई.
दिनांक : ०९ एप्रिल, २०२६